दिनांक २२/०१/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST DETECTION OF THE MONTH** " **माहे नोव्हेंबर—२०१९** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर—२०१९

| | | |
|---|---|---|
| **०१** | **गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष—२** | **कल्याण तालुका पोलीस ठाणे, जि.ठाणे गु.र.क्र. ५६७/२०१९, कलम ३०२,२०१ भादवि.** |

**—:खून करुन खूनाचा पुरावा नष्ट करणे:—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— दिनांक १३/०९/२०१६ रोजीचे पुर्वी रात्रौ ११.०० वाजताच्या सुमारास सिध्दीविनायक नगर, पंचवटी नाका मांडा (प) ता. कल्याण जि. ठाणे येथील कलेक्ट्रिक डेपो आणि कचरा कुंडीजवळ मयत उमेश मानुस्करे याने त्याचा लहान भाऊ विजय लक्ष्मण मानुस्करे याचेकडे दारू साठी पैशांची मागणी केली. तेंव्हा त्याने पैसे देण्यास नकार दिला त्याचा राग मनात धरून उमेश याने हातातील बिअरची बाटली घेवून विजय याच्या अंगावर धावला असता, विजय याने ती बाटली हिसकावून घेवून उमेश याच्या डोक्यात मारून त्यास गंभीर दुखापत करून जिवे ठार मारले. त्यानंतर आरोपी विजय मानुस्करे याने उमेश याचे प्रेत अर्धवट गोणीत भरून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने नदीच्या वाहत्या पाण्यात टाकून दिले म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | ऱ्हदयनारायण कन्हैयालाल मिश्रा, वय—४६ वर्षे, धंदा—नोकरी, |
| **बळीत/मयत** | :— | उमेश लक्ष्मण मानुस्करे वय—२५ वर्षे, धंदा—नाही |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | विजय लक्ष्मण मानुस्करे , वय—२५ वर्षे.<br>दिनांक ०८/११/२०१९ |

**तपास कौशल्य** :—गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष—२, गु.अ.वि.मुंबई येथे कार्यरत असलेले पोनाक्र. ९८०६३६/ऱ्हदयनारायण मिश्रा यांना त्यांच्या विश्वसनीय बातमीदाराने सन—२०१६ साली सिध्दीविनायक नगर, टिटवाळा, जि.ठाणे येथे वास्त्यव्यास असलेला इसम विजय याने त्याचा सख्खा मोठा भाऊ उमेश यास जिवे ठार मारून त्याचा मृतदेह टिटवाळा येथील कालु नदीच्या वाहत्या प्रवाहात फेकून दिला अशी माहिती दिली.

सदर खूनाचा गुन्हा करून आरोपी मोकाट फिरतोय ही बाब फारच गंभीर होती. परंतु पोलीसांनी त्यास अटक करण्याऐवजी अधिक पुरावे जमा करण्यावर भर देवून आरोपीविरूध्दचे भक्कम पुरावे जमा करण्यासाठी नेमलेल्या कक्ष—२ कार्यालयाच्या पथकाने केलेल्या चौकशीत मयत उमेश मानुस्करे हा अभिलेखावरील गुन्हेगार असल्याची माहिती मिळून आली. म्हणून लो.टि. मार्ग पोलीस ठाणे, वि.प.मार्ग पोलीस ठाणे, डॉ.दा.भ.मार्ग पोलीस ठाणे व पायधुनी पोलीस ठाणे ई. पोलीस ठाणेचा अभिलेख तपासला असता, पायधुनी पोलीस ठाणे गु.र.क्र.२८/२०१६, कलम ३७९ भादवि. या गुन्हयात दि. ०४/०२/२०१६ रोजी अटक केल्याचे समजून आले.

त्यानंतर आरोपी मुंबई मध्यवर्ती कारागृह, तळोजा मध्यवर्ती कारागृह व ठाणे मध्यवर्ती कारागृहात आरोपीतांबाबत माहिती घेतली असता, आरोपी उमेश यास पायधुनी पोलीस ठाणेच्या गुन्हयात शिक्षा झाल्यानंतर त्यास मुंबई मध्यवर्ती कारागृहातून तळोला जेलमध्ये पाठविल्याची

माहिती मिळून आल्याने तळोजा जेलमधून आरोपी उमेश याचेबाबत माहिती घेतली असता, त्यास ६ महिन्याची शिक्षा सुनावण्यात आली होती व तो दिनांक २७/०८/२०१६ रोजी शिक्षा भोगून तळोजा जेलमधून बाहेर आल्याची माहिती मिळून आली.

मिळालेल्या माहितीनुसार सिध्दीविनायकनगर, टिटवाळा येथे पथकाने प्रत्यक्ष जावून घटनास्थळाची व तेथूनच जवळ असलेल्या कालु नदीच्या प्रवाह मार्गाची पाहणी केली. कालु नदीच्या प्रवाहाच्या मार्गाने येणारे खडकवासला, टिटवाला, कल्याण तालुका व पडघा पोलीस ठाणेस हद्दीत बेवारस मृतदेहासंदर्भाने अपमृत्यु प्रकरणाची माहिती घेण्यात आली. त्याप्रमाणे कल्याण तालुका पोलीस ठाणेच्या हद्दीत दिनांक १३/०९/२०१६ रोजी २०.०० वाजता मौजे पिसे डॅम्पच्या खालच्या बाजुस छोटया बंधाऱ्या खालच्या प्रवाहात एक अनोळखी पुरूष जातीचा ४० ते ४५ वर्षाचा पुर्णपुणे कुजलेल्या स्थितीत असलेला मृतदेह मिळून आल्याचे व त्याबाबत दिनांक १४/०९/२०१६ रोजी अपमृत्यु नों.क्र. १३२/२०१६, कलम १७४ फौ.दं.प्र.सं.अन्वये नोंद असल्याचे समजून आले. वर नमुद बेवारस मृतदेहाच्या संबधाने आकस्मात मृत्यु अंतिम समरी मंजुरीची कागदपत्रे उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, कल्याण उप विभाग, कल्याण यांच्याकडून प्राप्त केली. प्राप्त केलेल्या कागदपत्रातील मृतदेहाच्या अंतिम शवविच्छेदन अहवालाचे अवलोकन केले असता, वैद्यकिय अधिकारी यांच्या मते मयत इसम हा २० ते ३० वर्षे वयोगटातील असावा असे नमुद असल्याने मयत इसम हा जेलमधून सुटून आल्यानंतर १४ ते १५ दिवसानंतर मिळून आल्याने सदरचा मृतदेह हा उमेश मानुस्करे याचाच असल्याचा दाट संशय आला. नातेवाईकांनी त्याचे हरविलेबाबत ठाणे ग्रामीण व मुंबई शहरातील पोलीस ठाण्यास तक्रार दिली आहे किंवा कसे? याची तपासणी करता, कोठेही तक्रार केली नसल्याचे आढळून आले. उमेश मानुस्करे हा जिवंत असल्याबाबत कुठेही माहिती मिळून आली नाही. यावरून त्याचा खून झाल्याची दाट शक्यता दिसून आली.

कक्ष—२ च्या पथकास मिळालेल्या माहितीनुसार आरोपीत इसम नामे विजय मानुस्करे वय—२५ वर्षे यास दिनांक ०७/११/२०१९ रोजी मस्जिद बंदर येथून चौकशी कामी ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे चौकशी करता सुरवातीस तो उमेश हा कोणत्यातरी गुन्हयात कारागृहात असावा अशी माहिती देवून तपास यंत्रणेस कोणतेही सहकार्य केले नाही. तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी त्याच्याकडे कसून व कौशल्याने केलेल्या चौकशीत त्याने त्याचा भाऊ उमेश लक्ष्मण मानुस्करे याचा खून केल्याची कबुली दिली. त्यानुसार त्याने घटनेची खालील प्रमाणे माहिती दिली.

सप्टेंबर — २०१६ च्या महिन्यात आरोपी, त्याचा मयत मोठा भाऊ व इतर दोन नातेवाईक असे कामाच्या ठिकाणावरून मस्जिद बंदर, मुंबई येथून रात्रौ रेल्वेने टिटवाळा रेल्वे स्टेशन येथे उतरले व बाहेर आल्यावर मयत याने बिअर शॉप मधून दोन बिअर घेतल्या. त्यानंतर मयत हा बिअर पित घराच्या दिशेने सर्वजण जात असतांना सिध्दीविनायक नगर येथील घराच्या जवळील मैदान व झाडी असलेल्या ठिकाणी सर्वजण आले असता, सोबत असलेले नातेवाईक आप आपल्या घरी गेले. मात्र मयत व त्याचा लहान भाऊ आरोपी हे दोघे तिथेच थांबले. सदरवेळी मयत याने त्याचा लहान भाऊ आरोपी याच्याकडे दारू पिण्यासाठी आणखी पैशाची मागणी केली असता, आरोपीने पैसे देण्यास नकार दिला. यावरून त्यांच्यात भांडण झाले. भांडणात आरोपीने मयताच्या हातातील बिअरची बाटली हिसकावून घेवून त्याच्या डोक्यात मारली. त्यामुळे डोक्यातून रक्तस्त्राव होवून तो रक्तबंबाळ झाला. त्याचवेळी पुन्हा आरोपीने फुटलेली बाटली त्याच्या पोटात मारली. त्यामुळे तो जमीनीवर पडला.

सदर घटनेत आरोपी यांच्या अंगावरील पॅन्ट व शर्टास रक्त लागल्याने त्याने घटनास्थळाच्या जवळच राहत असलेला त्याचा चुलत भाऊ यास फोन करून त्याचे स्वत:चे कपडे घेवून येण्यास सांगितले. त्याप्रमाणे तो पॅन्ट व शर्ट घेवून तेथे गेला असता, आरोपी याच्या हातावर व कपडयावर रक्ताचे डाग असल्याचे त्याने पाहीले. त्याने आणलेले कपडे आरोपी याने घातले व रक्ताने भरलेले कपडे तेथील झाडीत फेकून दोघे घरी गेले. त्यानंतर सुमारे एक तासाने आरोपी हा त्याचा चुलत भाऊ याच्या घरी गेला व त्याच्या सोबत येण्यास विनंती केली. त्यामुळे चुलत भाऊ हा आरोपी सोबत मैदानात झाडी असलेल्या ठिकाणी आला. त्या ठिकाणी उमेश मानुस्करे हा पडला होता व त्याचे कपडे रक्ताने माखले होते. म्हणून त्याने काय झाले असे आरोपीला विचारता, आरोपीने उपरोक्त कारणावरून उमेश याचा खून केल्याची माहिती त्यास दिली.

आरोपीने त्याच्या भावाचा मृतदेह सोबत आणलेल्या गोणीमध्ये अर्धवट भरला व जवळच असलेल्या कालु नदीच्या वाहत्या पाण्याच्या प्रवाहात रात्रौ अंदाजे ००.१५ वाजण्याच्या सुमारास टाकून दिला. तेंव्हा आरोपीने त्याच्या चुलत भावास कोणास सदर घटनेबाबत सांगू नकोस म्हणून दटावले होते.

अशा प्रकारे आरोपीने दिनांक १३/०९/२०१६ रोजीचे पुर्वी त्याचा मोठा सख्खा भाऊ उमेश लक्ष्मण मानुस्करे वय–२७ वर्षे याचा दारू पिण्यासाठी पैशाची मागणी केल्यावरून झालेल्या भांडणात बिअरची बाटली डोक्यात व पोटात मारून जिवे ठार मारले व त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी मृतदेह गोणीत भरून कालु नदीच्या वाहत असलेल्या पाण्याच्या प्रवाहात फेकून दिला असल्याची कबुली दिली आहे. आरोपी यास त्याचे नातेवाईक व मित्र हे त्याचा मयत मोठा भाऊ कोठे गेला आहे? याबाबत विचारता आरोपी हा मयत याच्या गुन्हेगारी अभिलेखाचा फायदा घेवून तो जेलमध्ये असल्याचे लोकांना सांगत असे.

सदरचा खुनाचा गुन्हा उघडकीस आल्यानंतर कल्याण तालुका पोलीस ठाणे येथे नमुद आरोपीचा ताबा देण्यात आला असून सदर घटनेबाबत दिनांक ०८/११/२०१९ रोजी कल्याण तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५६७ /२०१९, कलम ३०२,२०१ भादवि. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्या गुन्हयात नमुद आरोपीस अटक करण्यात आली आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष–२ तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | प्रपोनि. | संजय देवराम निकुंबे | प्रशस्तीपत्र |
| २ | पोनि. | अर्जुन मारूती जगदाळे | प्रशस्तीपत्र |
| ३ | स.पो.नि. | गणेश अशोक केकाण | प्रशस्तीपत्र |
| ४ | पोहक्र. २८०२२ | प्रकाश आत्माराम पाष्टे | प्रशस्तीपत्र |
| ५ | पोनाक्र. ९८०६३६ | ऱ्हदयनारायण कन्हैयालाल मिश्रा | प्रशस्तीपत्र |
| ६ | पोनाक्र. ९८०३५२ | रामचंद्र नारायण पाटील | प्रशस्तीपत्र |
| ७ | पोनाक्र. ०३१०३३ | राजेश हरिशचंद्र सोनावणे | प्रशस्तीपत्र |
| ८ | पोशिक्र. ०६११६८ | प्रशांत रावसाहेब थिटमे | प्रशस्तीपत्र |

| ०२ | समतानगर पोलीस ठाणे परिमंडळ—१२ | गु.र.क्र.४३६/१९, कलम ३६३,३०२,२०१,३५४, भा.द.वि. सह कलम ८,१२ पोक्सो कायदा. |
|---|---|---|

**—:<u>कायदेशीर रखवालीतून पळवून नेवून खून करुन पुरावा नष्ट करणे</u>:—**

**<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :—** फिर्यादी नामे श्रीमती संध्या शेषराम गौड, वय ४१ वर्षे, यांनी त्यांची मुलगी नामे कु. सानिका शेषराम गौड, वय १४ वर्षे हीस दिनांक ०१/१०/२०१९ रोजी १४.०० वा. ते १६.०० चे दरम्यान '' रूम नं. ०७, संगम चाळ नं ३, गावदेवी रोड, जनिया कम्पाऊंड, पोयसर, कांदिवली (पुर्व), मुंबई— १०१ येथून कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून पळवून घेवून गेल्याबाबत दिनांक ०२/१०/२०१९ रोजी पोलीस ठाणेस दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| **<u>फिर्यादी</u>** | :— | श्रीमती संध्या शेषराम गौड, वय ४१ वर्षे, |
| **<u>बळीत/मयत</u>** | :— | कु. सानिका शेषराम गौड, वय १४ वर्षे |
| **<u>आरोपी अटक व दिनांक</u>** | :— | अजय अशोक बेनवंशी,वय २९ वर्षे.<br>१७/११/२०१९ |
| **हस्तगत मालमत्ता** | :— | अ) तलासरी पोलीस ठाणेने घटनास्थळावरुन ताब्यात घेतलेले लायटर<br>ब) आरोपीकडून हस्तगत वस्तुंचे वर्णन :—<br>१) मिल्टन कंपनीची पाण्याची स्टीलची बाटली<br>२) हिरव्या रंगाचे व त्यावर फिकट निळया रंगाचे फुलांची डीझाईन असलेले व त्याचे खालील दोन बटन तुटलेले व बटनाच्या ठिकाणी कपडा थोडा फाटलेला, तसेच त्याच्या कॉलरवर पाठीमागे आतील बाजुस इंग्रजीमध्ये GAS Basic असे लीहीलेला फूल बाहयाचा शर्ट.<br>३) क्रीम रंगाची कॉटन जिन्स पॅट त्याच्या पाठीमागील उजवीकडे कंबरेवर लेदरचे स्टीकर असून त्यावर इग्रजीमध्ये New style Ability असे लीहीलेले आहे. तसेच पुढील बाजुस चैनपासून खाली फाटलेली.<br>४) एक निळया व पिवळया रंगाची फूलांची डीझाईन असलेली बेडशीट<br>५) निळया रंगाचे बजाज ॲव्हेंजर मोटर सायकल क्रमांक MH-47-V-3566 इंजिन क्रमांक — PDYCHL89894,<br>चेसीस क्रमांक — MD2A85CYXHCL17056<br>पुढील मडगार्डवर सिल्वर रंगाची पट्टी असलेली व टाकीवर AVENGER असे इग्रजीत लीहीलेले,किं.रु. १,००,०००/—<br>६) ओप्पो कंपनीचा काळया व सिल्वर रंगाचा मोबाईल फोन त्याचा आय.एम.ई. आय. क्रमांक ८६३४९७०३५९७९७७६ / ८६३४९७०३५८७८७६८ त्यामध्ये सिमकार्ड नाही असा मोबाईल फोन, |

**<u>तपास कौशल्य</u>** :— नमूद गुन्हयातील अपनयन मुलीच्या शोधकामी माहिती प्राप्त करण्याच्या अनुषंगाने साक्षीदारांचे जबाब नोंद करण्यात आलेले आहेत. तसेच फिर्यादी यांच्याकडे त्यांच्या अपनयन मुलीच्या शोधकामी त्यांचा कोणावर संशय आहे का? याबाबत तपास करता दिनांक १३/११/२०१९ रोजी त्यांनी त्यांच्या मुलीस यापूर्वी त्यांच्या समोर राहणारा मुलगा अजय बेनवंशी याने हात पकडून छेडछाड केली होती. त्यावेळी त्यांनी त्याच्या घरी जावून त्यास ओरडून त्यांच्या मुलीस पुन्हा हात लावल्यास पोलीसात तक्रार करेन असे बजावून सांगीतले असल्याची माहिती दिली

होती.

तसेच मुलीच्या शोधकामी फिर्यादी यांचेकडून त्यांच्या अपनयन झालेल्या मुलीचा मोबाईल क्र. ८१६९३३७८४५ प्राप्त केला व सदर मोबाईल क्रमांकाचे सी.डी.आर. व टॉवर लोकेशन मोबाईल कंपनीकडून प्राप्त करुन सीडीआरची तपासणी केली. त्यामध्ये मोबाईल क्र. **१) ८१०८४४४६६५, २) ९००४१०६३८८, ३) ९१६७०४३१६६, ४) ९१६७२२३६८५, ५)८१०८८२९१३८, ६)९३२४०३१०९४, ७)९३७२६१९०६१, ८) ९६५३३६५२७७, ९) ८४५२९९९११३** हे मो.क्र. संशयीत मिळून आले. म्हणून नमूद मोबाईल क्रमांकाचे सी.डी.आर. व टॉवर लोकेशन मोबाईल कंपनीकडून प्राप्त केले. त्यामध्ये अपनयन मुलीच्या मोबाईल सीडीआरमध्ये संशयीत मोबाईल क्रमांकापैकी फिर्यादी यांनी संशय व्यक्त केलेला इसम अजय बेनवंशी याचा मो.क्र. **८१०८४४४६६५** देखील आढळून आला. तसेच सदर इसमाचे दिनांक ०१/१०/२०१९ रोजीचे लोकेशन तलासरी, वापी या ठिकाणी असल्याचे समजून आले.

त्या अनुषंगाने संशयीत इसम अजय बेनवंशी यास पोलीस ठाणेस चौकशीकामी बोलविले असता तो पोलीस ठाणेस चौकशीकामी तात्काळ हजर राहत होता. यावरुन त्याने सदरचा गुन्हा केलेला नाही. असे भासविण्याचा प्रयत्न करत होता. तसेच पोलीसांची दिशाभुल करत होता. परंतु तांत्रीक तपास हा गुन्हा घडल्यापासून नियमीत चालू होता. त्या अनुषंगाने साक्षिदार यांच्याकडे तपास चालू होता. चौकशीत तांत्रीक बाबी व इतर गुप्त माहिती प्राप्त करुन दिनांक १७/११/२०१९ रोजी संशयीत अजय बेनवंशी यास ताब्यात घेवून पोलीस ठाणेस आणून त्याच्याकडे सखोल तपास केला असता त्याने गुन्हयातील अपनयन झालेल्या मुलीस दिनांक ०१/१०/१९ रोजी दुपारी १४.३० वाजण्याच्या सुमारास त्याच्या घरी बोलविले व तीच्याशी जबरदस्तीने शारीरीक संबंध ठेवण्याचा प्रयत्न करु लागला. त्यावेळेस बळीत मुलीने प्रतीकार करण्याचा प्रयत्न करुन ओरडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संशयीत आरोपीने तेथे बाजुला असलेल्या मिल्टन कंपनीची पाण्याची बाटली तीच्या डोक्यात मारली व ती ओरडू नये म्हणून तीचा दोन्ही हाताने गळा दाबुन जिवे ठार मारले व तीला एका मोठ्या बॅगमध्ये भरुन तलासरी पालघर या ठिकाणी नेवून टाकल्याचे त्याने सांगीतले. त्यावरुन आरोपी नामे **अजय अशोक बेनवंशी,वय २९ वर्षे** यास दिनांक १७/११/१९ रोजी १५.३४ वाजता नमूद गुन्हयामध्ये अटकेची कारणे सांगून अटक केली.

त्यानंतर नमूद अटक आरोपीने स्वखुशीने दोन पंचासमक्ष निवेदन केले की '' दिनांक ०१/१०/२०१९ को दोपहर के समय मैने मेरे रहते घर संगम चाल, खोली नं. ०५, आशिर्वाद मेडीकल के पास, गांवदेवी रोड, पोयसर कांदीवली (पूर्व), मुंबई यहापर मेरे सामने रहनेवाली लडकी सानिका गौड इसके साथ शारीरीक संबंध करने के उद्‌देश से उसे अपने घर बुलाया था, मै उसके साथ शारीरीक संबंध करने गया तो उसने विरोध किया. इसलीये मैने उसके सिरपर गुस्से से मिल्टन कंपनी की वॉटर बॉटल मारकर उसका गला दबाकर उसे मार डाला. और उसकी बॉडी को रफादफा करने के लीए उसे काली कलर की बॅग मे डालकर साथ मे निले रंगका लायटर जिसका उपरी हिस्सा स्टील का है उसे लेकर मोटर सायकलपर से जिस जगह ले जाकर मैने बॉडीपर पेट्रोल डालकर जलाया. वो बॉडी और वो जगह मै आपको दिखाता हूॅ आप मेरे साथ चलो '' अशा प्रकारे आरोपीने निवेदन केल्याने त्याचे निवेदन नोंद करुन पोलीस पथक पंच व आरोपीसह खाजगी वाहनाने तपासकामी रवाना झाले. त्यानंतर आरोपीच्या सांगण्याप्रमाणे पोलीस पथक वाहनातून दहिसर चेक नाका मार्गे मुंबई अहमदाबाद महामार्ग क्र. ८ वरुन इभाडपाडा गावाच्या हद्‌दीत महामार्गाच्या पश्चिमेस साईडला असलेल्या गणपत बेंड्या भोये यांच्या फॉरेस्ट प्लॉटजवळ पूर्वेस लागून व मुंबई अहमदाबाद रोडला असलेल्या लोखंडी गार्डपासून १० फूट अंतरावर व रोडच्या बाजुला असलेल्या दिशा दर्शकाच्या १२ फूट अंतरावर नाल्यामधील खड्यात असलेले व आजु—बाजुस झाडीझुडपे असलेले घटनास्थळ आरोपीने दाखविले. सदरच्या घटनास्थळी गुन्हयातील बळीत मुलगी सानिका

गौड हीचा मृतदेह बॅगेतून काढून मृतदेहावर पेट्रोल टाकून ती जाळून दिल्याचे व त्यानंतर तेथून निघून गेल्याचे पंचासमक्ष सांगीतले.

अटक आरोपीने वर नमूदप्रमाणे दिलेल्या माहितीनुसार सदरची हद्द तलासरी पोलीस ठाणेची असल्याने नमूद पोलीस ठाणेस जावून चौकशी केली असता त्या ठिकाणी सदर घटनास्थळावरील मिळालेल्या मृतदेहाबाबत दिनांक ०३/१०/२०१९ रोजी गु.र.क्र. १६४/२०१९ कलम ३०२,२०१ भादविसं प्रमाणे गुन्हा नोंद असल्याचे समजले. त्याबाबत संबंधित गुन्हयाचे तपास अधिकारी यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सदर मृतदेह हा मुलीचा होता व मृतदेहाचे सर जे.जे. रुग्णालय मुंबई याठिकाणी शवविच्छेदन झाल्यानंतर सदरचा मृतदेह राखून ठेवण्याच्या अवस्थेत नसल्याने (Decompose) डॉक्टरांच्या सल्यानुसार सदर मृतदेहाचे दिनांक ०४/१०/२०१९ रोजी अंत्यसंस्कार ( विल्हेवाट ) लावण्यात आल्याचे सांगीतले आहे.

त्यानुसार तलासरी पोलीस ठाणेकडून नमूद गुन्हयाच्या मूळ कागदपत्रांची मागणी केली असता त्यांनी प्रथम खबरी अहवाल, घटनास्थळ पंचनामा, मरणोत्तर पंचनामा, तसेच सर जे.जे. रुग्णालय मुंबई यांचा प्रोव्हीजनल कॉज ऑफ डेथ प्रमाणपत्र अशी कागदपत्रे सांक्षाकीत करुन दिली आहेत. तसेच सदर ठिकाणी बळीत मुलीच्या आई वडीलांना मृतदेहाचे फोटो दाखविले असता त्यांनी सदरचा मृतदेह त्यांच्या मुलीचा असल्याचे ओळखलेले आहे.

त्यानंतर पोलीस पथक आरोपीसह पोलीस ठाणेस परत आल्यानंतर व एकंदर गुन्हयातील तपासाचा अनुक्रम पाहता अटक आरोपीने गुन्हयातील बळीत मुलीस जिवे ठार मारुन तीचा मृतदेह जाळून विल्हेवाट लावल्याची खात्री झाल्याने नमूद गुन्हयामध्ये कलम ३०२,२०१ भादविसं अशा कलमांची वाढ करण्यात आली आहे.

तसेच नमूद गुन्हयातील बळीत मुलगी ही १४ वर्षाची असल्याबाबत फिर्यादी यांनी सांगीतलेले असून त्याबाबत तीच्या जन्माचा दाखला प्राप्त केला. तीची जन्मतारीख १२/०३/२००५ अशी असून त्यावरुन तीचे गुन्हयाचे वेळचे वय १४ वर्षे ६ महिने २० दिवस असल्याची खात्री झाली. यावरुन बळीत मुलगी ही अल्पवयीन असून अटक आरोपीने तीच्याशी शारीरीक संबंध ठेवण्याच्या हेतुन तीच्या छातीला हात लावला असल्याने सदर गुन्हयामध्ये कलम ३५४ भादविसं सह कलम ८,१२ पोक्सो २०१२ कलमाची वाढ करण्यात आली आहे.

तलासरी पोलीस ठाणे जिल्हा पालघर या ठिकाणी नमूद गुन्हयातील बळीत मुलीचा मृतदेह मिळाल्याबाबत गुन्हा नोंद क्रमांक १६४/२०१९ कलम ३०२,२०१ भादविसं करण्यात आलेला असून दोन्ही गुन्हे एकाच घटनेबाबत असल्याने तलासरी पोलीस ठाणेच्या गुन्हा नोंद क्रमांक १६४/२०१९ कलम ३०२,२०१ भादविसं या गुन्हयाचे मूळ कागदपत्र समतानगर पोलीस ठाणेस गुन्हयामध्ये समाविष्ट करण्याकरीता सदरचे कागदपत्र सादर करण्यास मा. वरिष्ठांच्या आदेशाने तलासरी पोलीस ठाणेकडून गु.र.क्र. १६४/२०१९ या गुन्हयाचे मूळ कागदपत्र प्राप्त करुन नमूद गुन्हयामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत.

अटक आरोपीस दिनांक २५/११/१९ पर्यत पोलीस कोठडी दिली असता त्याच्या पोलीस कोठडी दरम्यान त्याच्याकडे तपास करता दिनांक १८/११/१९ रोजी आरोपीने निवेदन करुन नमूद गुन्हा करताना परीधान केलेली कपडे, तसेच बळीत मुलीस डोक्यामध्ये मारलेली मिल्टन कंपनीची वॉटर बॉटल घरामध्ये दाखविली. त्याचप्रमाणे घरातील बेडशीट असा मुद्देमाल तपासकामी पंचनाम्याअंतर्गत ताब्यात घेण्यात आला आहे.

तसेच नमूद गुन्हयातील अटक आरोपी हा दिनांक ०१/१०/२०१९ रोजी कांदीवली (पूर्व) परिसरामध्ये कोठे कोठे गेला होता. याबाबत संभाव्य ठिकाणच्या सी.सी. कॅमे—यांचे फूटेजच्या डी. व्ही.डी. मुख्य नियंत्रण कक्षाकडून प्राप्त करण्यात आलेल्या आहेत.

तसेच अटक आरोपी हा बळीत मुलीचा मृतदेह काळया रंगाच्या बॅगमध्ये विल्हेवाट लावण्याकरीता बजाज अॅव्हेंजर मोटर सायकल क्रमांक MH-47-V-3566 वरुन तलासरी या ठिकाणी जात असतानाचे खानीवडे टोल नाका विरार पालघर येथील टोल नाक्यावरील सी.सी.कॅमे—यातील फूटेज सदर ठिकाणाहून पेनड्राईव्हमध्ये प्राप्त करण्यात आलेले आहे.

तसेच अटक आरोपीने दिनांक २०/११/२०१९ रोजी तपासादरम्यान दोन पंचासमक्ष निवेदन करुन नमूद गुन्हयातील बळीत मुलीचा मृतदेह काळया बॅगमध्ये भरुन मोटर सायकलवरुन नेवून त्याची विल्हेवाट लावल्याची माहिती दिली. सदरची काळया रंगाची बॅग व गुन्हयामध्ये वापरलेली मोटर सायकल तसेच आरोपीचे लोकेशन तलासरी या ठिकाणी दाखविलेल्या मोबाईल क्रमांकाचा मोबाईल हॅडसेट याबाबत आरोपीकडे सखोल तपास केला असता अटक आरोपीने शकील बार्बर शॉप समोरुन रोडवरुन सिंग इस्टेट रोड नं. ००, ठाकुर व्हीलेज कांदीवली (पूर्व), मुंबई येथून गडद निळया रंगाची बजाज अॅव्हेंजर Street मोटर सायकल क्रमांक MH-47-V-3566 किं.रु. १,००,०००/— ही तसेच मोटर सायकलच्या सिटखाली लपवून ठेवलेला व गुन्हा करताना वापरलेला ओप्पो कंपनीचा काळया व सिल्वर रंगाचा मोबाईल फोन त्याचा आय.एम.ई.आय. क्र. ८६३४९७०३५९७९७७६/८६३४९७०३५८७८७६८ त्यामध्ये सिमकार्ड नाही असा मोबाईल फोन हया वस्तु दोन पंचासमक्ष काढून दिल्या असून त्या पंचासमक्ष पंचनामा करुन गुन्हयाच्या तपासकामी ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे अटक आरोपीने तपासामध्ये वेळोवेळी विसंगती सांगितलेली असुन त्याने सांगितल्याप्रमाणे दि. ०१/१०/२०१९ रोजी नमूद बळीत मुलीस त्याचे घरी बोलावल्यानंतर ती त्याचे घरातील सोफा कम बेडवर बसली असताना त्याने तीच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला, त्यावर तीने ओरडून प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता त्याने तेथील स्वयंपाकाचा कठडयावरील मिल्टन कंपनीची वॉटर बॉटल तीच्या डोक्यावर मारली व तीचा मरेपर्यत गळा दाबुन तीला ठार केले. परंतू बळीत मुलीने गळा दाबल्यावर तडफडत असताना नमूद सोफयावळील लाकडी टीपॉय वरील असलेल्या काचेवर तीचा पाय लागला व ती काच फुटून तीच्या पायाला लागुन रक्त आले होते. सदरचे रक्त हे नमूद आरोपीच्या घरात जमिनीवर पडल्याचे सांगितले. परंतू त्याने नमूद रक्त त्याचवेळी पोछा मारून पुसून टाकले व नंतर काच व लाकडी टीपॉय त्याच दिवशी रात्रौ कचऱ्याच्या डब्यात टाकून नष्ट केले.

सदरबाबत नमूद घरातील सोफा, पीलो कव्हर व इतर वस्तूंवर नमूद मुलीचे रक्ताचे डाग अथवा बलात्कार केला असल्यास त्याचे वीर्याचे डाग, बळीत मुलीचे केस व पुराव्याच्या दृष्टीने महत्वाच्या इतर तत्स्म पुरावे/दुवे मिळण्याची शक्यता असल्याने त्याकरीता दिनांक २१/११/२०१९ रोजी फॉरेन्सीक पथक घटनास्थळी निरीक्षणाकरीता घटनास्थळी नेले. सदर फॉरेन्सीक पथकाने घटनास्थळावरील रुममधील सर्व वस्तुची बारकाईने पाहणी केली असता घरातील पाण्याचा निळया रंगाचा प्लॅस्टीकच्या ड्रमवर लालसर डाग दिसून आला असता नमूद पथकाने त्याचे निरीक्षण केले असता ते रक्त असल्याचे दिसून आले. सदर रक्ताचा अंश (ैजंपद ) रासायनिक टीमने रासायनिक किटमधील कापसाच्या सहाय्याने दोन वेळा पुसुन घेतले व सदरचे दोन्ही कापूस सफेद रंगाच्या कागदाच्या पाकीटामध्ये टाकून पोलीसांना सादर केले. त्याबाबत दोन पंचासमक्ष पंचनामा केला असून सफेद रंगाच्या पाकीटाकमध्ये टाकून दिलेली दोन पाकीटे ही पोलीसांनी दोन वेगवेगळया खाकी रंगाच्या पाकीटामध्ये टाकून त्यावर पंचाच्या व पोलीसांच्या सहयांचे लेबल लावून सिलबंद केले.

तसेच दिनांक २४/११/२०१९ रोजी अटक आरोपीकडे नमूद गुन्हयातील बळीत मुलीचा मृतदेह ठेवण्याकरीता वापरलेली काळया रंगाच्या बॅगबाबत कसून तपास केला असता अटक आरोपीने दोन पंचासमक्ष निवेदन करुन सदरची बॅग ज्याठिकाणी टाकली ते ठिकाण तलासरीकडून

मुंबईकडे येणा—या करंजविला नाला, पश्चिम दृतगती मार्ग, डहाणु पालघर येथील ब्रिजवरुन नाल्यात फेकून दिली असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे आरोपीसह पोलीस पथक पंच असे जावून सदरठिकाणी नाल्यामध्ये तसेच आजुबाजुच्या परिसरात नमूद बॅगचा शोध घेतला परंतु सदरची बॅग मिळून आली नाही. म्हणून सदरबाबत दोन पंचासमक्ष पंचनामा करुन पोलीस पथक पोलीस ठाणेस परत आले.

गुन्हयातील फिर्यादी यांची डी.एन.ए. चाचणीकरीता नमुणे काढण्यात आलेले असून ते मयत मुलीच्या डी.एन.ए.शी. तुलना करण्याकरीता रासायनिक विश्लेषक कालीना याठिकाणी पाठविण्यात आले आहे.तसेच नमूद गुन्हयातील मुद्देमाल विहीत वेळेमध्ये रासायनिक तपासणीकरीता रासायनिक विश्लेषक कालीना मुंबई याठिकाणी सादर करण्यात आलेला आहे.

अशा प्रकारे संशयीत आरोपी याने खूनासारखा गंभीर गुन्हा करुन पळून न जाता पोलीसांनी जेव्हा जेव्हा तपासकामी बोलविले त्या त्या वेळी पोलीस ठाणेस हजर राहून पोलीसांच्या तपासात दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला. परंतु बाजुस नमूद अधिकारी व अंमलदारांनी तांत्रीक बाबी व इतर पुरावे गोळा करुन सदरचा गुन्हा संशयीत आरोपी इसमानेच केलेला आहे असे निष्पन्न करुन त्यास अटक गंभीर स्वरुपाचा गुन्हा उघडकीस आणला.

**समतानगर पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | स.पो.आ. | लक्ष्मण नारायण चव्हाण | प्रशस्तीपत्र |
| २ | व.पो.नि. | राजु लक्ष्मण कसबे | प्रशस्तीपत्र |
| ३ | पो.नि. | रविंद्र मारूती रणशेवरे | प्रशस्तीपत्र |
| ४ | स.पो.नि. | सिध्दाराम महादेव म्हेत्रे | प्रशस्तीपत्र |
| ५ | स.पो.नि. | विजय गंगाधर रासकर | प्रशस्तीपत्र |
| ६ | पो.उ.नि. | अनिल काशिनाथ हाडळ | प्रशस्तीपत्र |
| ७ | पो.उ.नि. | दत्तात्रय शामराव पाटील | प्रशस्तीपत्र |
| ८ | पो.ह.क्र. २५५६९ | संजय खाशाबा मोरे | प्रशस्तीपत्र |
| ९ | पोहक्र ३१५६६ | रविंद्र मारूती जाधव | प्रशस्तीपत्र |
| १० | पोहक्र ३७९१ | सिताराम मारूती गुरव | प्रशस्तीपत्र |
| ११ | पोनाक्र ३३०५५ | शिवराम अनंत सावंत | प्रशस्तीपत्र |
| १२ | पोनाक्र १४८९८ | ऑस्कर व्हिक्टर कोलासो | प्रशस्तीपत्र |
| १३ | पोशिक्र ०३८३० | प्रशांत मंगेश शिवलकर | प्रशस्तीपत्र |
| १४ | पोशिक्र ०४०८१३ | विजय पुंडलीक सुर्यवंशी | प्रशस्तीपत्र |
| १५ | पोशिक्र ०६१३१५ | राजेंद्र जनार्दन गळवे | प्रशस्तीपत्र |
| १६ | पोशिक्र ०६१३८२ | अभिमन्यु सुर्यभान गव्हाणे | प्रशस्तीपत्र |
| १७ | पोशिक्र ११०२२३ | रोहन रमेश गायकवाड | प्रशस्तीपत्र |
| १८ | पोशिक्र ०८०१९२ | अभिषेक अरूण पाटणे | प्रशस्तीपत्र |
| १९ | पोशिक्र १११०९३ | सदाशिव हनुमंत वारंग | प्रशस्तीपत्र |
| २० | पोशिक्र ११३५०५ | सुमित अनिल अहिवळे | प्रशस्तीपत्र |